22-02-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 02/21/2025 11:29 PM Page 1

शिवाजी महाराज सामाजिक क्रांती घडवणारे राजे

वसंत कोळंबकर यांचे प्रतिपादन, तोरसे येथे शिवजन्म सोहळा साजरा

तोरसे : व्याखाते वसंत कोळंबकर सोबत तोरसेच्या सरपंच छाया शेट्ये, नवनिर्वाचित उपसरपंच विजय तोरस्कर, मुख्याध्यापिका संजना कोरगावकर, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सचिन गवस, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष उर्वी नाईक.

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २१ : शिवाजी महाराज यांनी आपल्या आयुष्यात फक्त लढायाच केल्या नाहीत तर ते सामाजिक सुधारणा आणि सामाजिक क्रांती करणारे लोकपालक राजे होते. स्वराज्याची निर्मिती करतानाच सर्व जातीधर्मातील मावळ्यांना न्याय देणारे ते उत्तम प्रशासक होते, असे प्रतिपादन व्याख्याते वसंत कोळंबकर यांनी केले. तोरसे येथे आयोजित केलेल्या शिवजन्म सोहळ्यावेळी ते बोलत होते.

ग्रामपंचायत तोरसे तसेच पालक शिक्षक संघ सरकारी प्राथमिक शाळा तोरसे यांच्या संयुक्त विद्यमाने तोरसे माऊली मंदिर येथे शिवजन्म सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी शिवचरित्राचे अभ्यासक तसेच व्याखाते वसंत कोळंबकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी शिवरायांची लोकशाही, शिवरायांचे रयतेवर असलेले प्रेम, शिवरायांची राजनीती आपल्या व्याख्यानातून उपस्थित शिवप्रेमींना पटवून दिली.

सदर कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर तोरसेच्या सरपंच छाया शेट्ये, नवनिर्वाचित उपसरपंच विजय तोरस्कर, मुख्याध्यापिका संजना कोरगावकर, शाळा व्यावस्थापन कमिटीचे अध्यक्ष सचिन गवस, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा उर्वी नाईक हे मान्यवर उपस्थित होते. सरपंच छाया शेट्ये यांनी आपल्या भाषणामध्ये शिवजयंती सोहळ्याच्या आयोजनाचे प्रयोजन विशद केले. छत्रपतींच्या स्वराज्य मध्ये माता भगिनी अतिशय सुरक्षित होत्या, असे सांगतानाच शिवरायांच्या स्त्री दाक्षिण्याचे उदाहरण त्यांनी दिले. उपसरपंच तोरस्कर यांनी आयोजकांचे कौतुक करताना आजच्या काळात राजकारणात असलेल्या प्रत्येक व्यक्तीने शिवरायांचा एकतरी गुण अंगी बाळगावा, असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर नृत्य व नाटिकांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आध्या आसोलकर व जिविका नाईक यांनी केले. दीपिका पाटकर हिने प्रास्ताविक केले. सिपिका परब हिने पाहुण्यांचे स्वागत व परिचय केला. तर भास्कर नाईक व कुमार गौरांग परब यांनी आभार मानले. यावेळी शेट्येवाडा येथील पालकांनी मुलांना अल्पोपहार दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व पालकांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाची सांगता शिवयात्रेने करण्यात आली. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ तसेच पालक उपस्थित होते.

गोवा संगीत महाविद्यालयाचे २८ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि.२१ : गोवा संगीत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालय कार्यक्रम कक्ष आल्तिनो– पणजी–गोवा येथे आयोजित केले आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखक व व्याख्याते गजानन हरिशचंद्र मांद्रेकर, (माजी प्राचार्य, श्री गणेश उच्चमाध्यमिक विद्यालय, म्हापसा) हे उपस्थित असतील, अशी माहिती गोवा संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशांक मक्तेदार यांनी दिली. या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त गोवा संगीत महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी त्यांच्यातील कलात्मकचे अद्वितीय दर्शन घडवतील, असेही प्राचार्य मक्तेदार यावेळी म्हणाले.

या स्नेहसंमेलनात महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच प्राध्यापक यांचे सुमधुर गायन, तबला व हार्मोनियम वादन होईल. विद्यार्थीवर्गामध्ये आलिषा सिमेपुरुषकर यांचे गायन, प्राजक्ता परब आणि अनिकेत ठाणेकर यांचे तबला सहवादन, तसेच समीर पेडणेकर , शुभंकना फडते आणि भिकाजी नारोजी यांच्या हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती या वेळी प्राचार्य मक्तेदार यांनी दिली. कार्यक्रमाची सांगता सहायक प्राध्यापक विक्रांत नाईक यांच्या शास्त्रीय गायनाने होईल.

वेशभूषा स्पर्धेस वेदश्री गडेकर प्रथम

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २० : मांद्रे स्वरगंधा विद्यालय आयोजित शिव जयंतीनिमित्त पेडणे तालुका स्तरीय वेशभूषा स्पर्धेस उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. पेडणे तालुक्यातील विविध प्राथमिक विद्यालयांतून एकूण २२ मुले या स्पर्धेत सहभागी झाली. स्पर्धेत प्रथम वेदश्री दिपक गडेकर (तारांराणी) – हरमल पंचक्रोशी प्राथमिक विद्यालय, द्वितीय : सात्विक दामोदर नाईक (संभाजी) – विद्यावर्धिनी प्राथमिक विद्यालय तुये, तृतीय : वरदा विजेश शेटगांवकर (शिवाजी) – विद्याप्रसारक प्राथमिक विद्यालय मोरजी तर उत्तेजनार्थ बक्षिसे – विवान वासू सावंत (संभाजी) – अवर लेडी ऑफ रोझरी मांद्रे, आराद्या अर्जुन शेट्ये (जिजाऊ) – कमळेश्वर प्राथमिक विद्यालय कोरगांव, दक्षित ज्ञानेश्वर सुभाजी (बाजी प्रभू) – हुतात्मा मनोहर पेडणेकर प्राथमिक विद्यालय पेडणे, व स्वयम राकेश नाईक (शिवाजी) – श्री भगवती प्राथमिक विद्यालय पेडणे यांना प्राप्त झाली.

स्पर्धेचे उद्घाटन मराठवाडा सातेरी देवस्थानचे अध्यक्ष जगन्नाथ पार्सेकर , नाट्य कलाकार प्रभाकर गांवकर व हरिष शेटगांवकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व शिवरायांच्या प्रतिमेला हार अर्पण करून करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना मांद्रेचे नवनिर्वाचित सरपंच राजेश मांद्रेकर यांच्या हस्ते रोख बक्षिसे व प्रशस्तिपत्रके देवून गौरविण्यात आले. मुलांनी विविध ऐतिहासिक भुमिका सादर करून स्वत:मधील कौशल्य व आत्मविश्वासाचे सुंदर उदाहरण प्रस्तुत केले आहे,पालकांनी त्यांना जास्तीतजास्त स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे अशी विनंती सरपंच राजेश मांद्रेकर यांनी केली.

यावेळी व्यासपीठावर स्वरगंधा संस्थेचे व्यवस्थापक संतोष सावंत, स्वरगंधा संस्थेचे सचिव सोमनाथ पार्सेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक रेश्मा सावंत हिने केले. सूत्रसंचालन राजेश हरमलकर व प्रगती सावंत यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सोनाली सावंत हिने केला तर आभार प्रदर्शन पल्लवी नाईक हिने आभार मानले. स्पर्धेचे परिक्षण प्रभाकर गांवकर व हरिष शेटगांवकर यांनी केले.

मडगाव पॉप्युलर विद्यालयात शिवजयंती साजरी

मडगाव, दि.२१ :

पॉप्युलर विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला विद्यालयाचे व्यवस्थापक सचिन भांडारी, मुख्याध्यापिका सुचित्रा देसाई, माजी विद्यार्थी मंगेश नाईक, नवीन रायकर उपस्थित होते. सर्वप्रथम शिवगर्जना करून छत्रपती महाराजांचा जयजयकार करण्यात आला. विद्यार्थिनी पूर्वजा दौडवार हिने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तद्नंतर व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व तसेच छत्रपती शिवरायांची चित्रे रेखाटून शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केलेल्या भितीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. शिवरायांच्या वेशभूषेत अनंत कुंकळ्ळीकर, श्रावण पाटील यांनी एकपात्री अभिनय सादर केला व तसेच आरोही कसबे व श्रावणी अंजीखाने यांनी जिजाऊंच्या वेशभूषेत एकपात्री अभिनय सादर केला. विद्यार्थी रुद्राज याने मुरारबाजी यांची भूमिका साकारून एकपात्री अभिनय सादर करून सर्वांचे मन जिंकले. नववीच्या विद्यार्थ्यांनी माय मराठी या गीतावर नृत्य सादर केले. संगीत शिक्षकांनी शिवरायांचे गौरव गीत सादर केले . शिवगर्जनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पान १ वरून

खनिज वाहतुकीचा तिढा कायम!

सांगण्याशिवाय कोणतेही ठोस आश्वासन त्यावेळी मिळाले नाही. त्यामुळे खनिज वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. मात्र, त्यानंतरही काही दिवसांपूर्वी कंपनीने रात्रीच्या वेळेस मायनिंग कामकाज सुरू केल्याने संतप्त ग्रामस्थांनी मायनिंग साईटवर धडक देत काम बंद पाडले होते. त्यानंतर ग्रामस्थांच्या मागणीवरून उपजिल्हाधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून हे निर्देश दिले आहेत.

सिद्दिकी खानविरोधात तिसरे आरोपपत्र दाखल

त्याला अटक करण्यात आले.
एसआयटीच्या तपासात सुलेमान खान हा तिन्ही प्रकरणांचा मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले. त्याने मालमत्तेच्या बनावट कागदपत्रांद्वारे प्राधिकरणांची दिशाभूल केली आणि दस्तऐवजांची फेरफार प्रक्रिया पूर्ण करून जमिनी बळकावण्यात यश मिळवले असल्याचे तपासात उघड झाले आहे.

मडगाव न्यू मार्केट ट्रेडर्स असोसिएशनची नोंदणी रद्द
मडगाव न्यू मार्केट ट्रेडर्स असोसिएशनची नोंदणी १९९७ मध्ये करण्यात आली होती. २९ जून १९९७ रोजी झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत अशोक मयेकर यांनी आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी केल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, अशोक मयेकर यांचे १९९६ मध्येच निधन झाले होते, हे उघडकीस आल्यानंतर, असोसिएशनच्या अहवालांमधील मोठी विसंगती समोर आली. याच कारणामुळे जिल्हा निबंधकांनी असोसिएशनची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेतला. सल्लागार विनोद शिरोडकर, राजन आजगावकर आणि अमित नाईक यांच्या सहकार्याने नवीन समिती स्थापन करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि कारभारात पारदर्शकता ठेवण्यासाठी समिती कटिबद्ध राहणार आहे, असे सांगण्यात आले. मडगाव न्यू मार्केटमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी महापालिका प्रशासन व स्थानिक आमदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन विनोद शिरोडकर यांनी केले.

भारतीय निर्वासितांची ससेहोलपट सुरूच

जवळून समन्वय साधत आहोत.
ट्रम्प प्रशासनाने बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्ध कठोर धोरण अवलंबले असून, त्याअंतर्गत आतापर्यंत ३३२ भारतीय नागरिकांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले आहे. पनामाला पोहोचलेल्या २९९ स्थलांतरितांपैकी केवळ १७१ जणांनी त्यांच्या मूळ देशात परत जाण्यास सहमती दर्शवली आहे. उर्वरित नागरिकांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता कायम आहे. भारत सरकारने या प्रकरणात अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. तसेच, अमेरिकेतील भारतीय स्थलांतरितांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केंद्र सरकारने तत्काळ उपाययोजना कराव्यात, असे आवाहनही करण्यात आले आहे.

शिवाजी महाराजांच्या कार्याचा प्रभाव अजूनही तितकाच विलक्षण

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २० : हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व जीवन चरित्राचा प्रभाव ३९५ वर्षानंतरही तितकाच प्रभावशाली आहे. आजही छत्रपती शिवाजी महाराज आमच्यात आहेत,ही भावना म्हणजे कळस असून मनाला फार मोठा आधार देऊन जाते,त्याचे प्रगल्भ विचार आत्मसात केल्यास निश्चित उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन पेडणे संत सोहिरोबानाथ अंबिये महाविद्यालयाचे प्रा. विष्णू वेटे यांनी केले.

हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय आयोजित शिवजयंती निमित्त नाट्यप्रवेश, पोवाडा गायन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर, प्राचार्य डॉ पांडुरंग पंडित, प्रा. डॉ. गीता येर्लेकर, प्रा. गौरेश वेळीप, ग्रंथपाल प्रमोद केरकर आदी उपस्थित होते.

शिव चरीत्र वाचा, तुमच्यात बोलावे चालू ठेवा व त्यातील असंख्य गोष्टी व विचारांचे स्मरण करा, आत्मसात करा. त्यांचे विचार चिंतन करताना, पिता, पुत्र, राजा, मित्र व एक शत्रू म्हणून त्यातील एखाद्या गुणाचा अवलंब आपण केल्यास,शिवजयंती उत्सव व छत्रपती शिवाजी महाराजसारखे होऊ शकतो व त्यासारखे सुदैवी होऊ, असे प्रा. वेटे यांनी व्यक्त केले. यावेळी प्रा. वेटे यांनी रायगड व पुणे भागातील छत्रपती शिवरायांच्या घटनांचा ओघवत्या शैलीत उल्लेख केला.

चेअरमन पार्सेकर म्हणाले की, छत्रपती शिवरायांचे विचार एकणे व वाचणे जितके महत्वाचे आहे, तितकेच किल्ल्यांना भेट दिल्यास खूप महत्व आहे. इतिहासातील मोठे नररत्न, ज्याच्या राज्याभिषेक व कार्य कर्तुत्वाचा ३९५ वर्षे आलेख म्हणजे सर्वांना उद्बोधक व प्रेरणादायी आहे. काळ परिस्थिती बदलली, तरीही छत्रपती शिवाजी महाराजांचे महत्व तसूभरही कमी झाले नाही हे विशेष. अद्यापही काही गोष्टीच्या योग्य निराकरणासाठी शिवरायांचे आदर्श कर्तुत्व नजरेसमोर ठेवून निर्णय घ्यावे लागतात.

प्रारंभी प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित यांनी मान्यवरांचे स्वागत केले व छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. प्रारंभी मान्यवरांनी दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. विद्यार्थिनी स्विटी गवस, सान्विका चोपडेकर, श्रुतिका नाईक, वैकुल सावळ आदींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन प्रा. नवसो परब तर मृणली सावंत यांनी आभार मानले. यावेळी परीक्षक अमर कोनाडकर व पराग पार्सेकर उपस्थित होते.

हरमल : नाट्यवाचन समारंभाचे उद्घाटन करताना प्रा. विष्णू वेटे. सोबत चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर,प्रा. डॉ पांडुरंग पंडित,प्रा डॉ गीता येर्लेकर, गौरेश वेळीप, प्रमोद केरकर व अन्य.

▶ प्रा. विष्णू वेटे : पार्सेकर महाविद्यालयात शिवजयंती साजरी

पार्से : चोनसाई येथे भरलेला बाजार.

मेहनतीशिवाय पैसे मिळविणे अशक्य

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २१ : आयुष्यात पैसा हा महत्त्वाचा आहे आणि तो मेहनतीशिवाय मिळविणे अशक्य आहे. हे पैसे कसे कमवावे, यासाठी सरकारी प्राथमिक विद्यालय चोनसाई शाळेच्या पालक शिक्षक संघाने बाजार डे चे आयोजन करून एक चांगला उपक्रम राबवल्याचे उद्गार पार्सेचे सरपंच अजय कलंगुटकर यांनी काढले.

सरकारी प्राथमिक विद्यालय चोनसाईने आयोजित केलेल्या 'बाजार डे' चे उद्घाटन केल्यानंतर सरपंच कलंगुटकर बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर पंचसदस्य सातार्डेकर, पंच स्वप्निल नाईक,

▶ सरपंच अजय कलंगुटकर : सरकारी प्राथमिक विद्यालय चोनसाईचा बाजार डे उत्साहात

मुख्याध्यापिका हर्षिता नाईक, बालवाडी शिक्षिका ज्योती पाळणी, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष विशांत आदी उपस्थित होते.

सरपंच कलंगुटकर यांनी सांगितले की, व्यावहारिक ज्ञान हे बाजारात गेल्यावर कळते. परंतु सरकारी प्राथमिक शाळेच्या शिक्षक आणि एक चांगला 'बाजार डे'चा उपक्रम राबवून व्यावहारिक ज्ञान कशा प्रकारचे संपादित करायचे असते. याचा उपक्रम आणि धडा घालून दिल्याचे सांगून अशा बाजार डे ला पालकांनीही मोठ्या संख्येने जे विद्यार्थी बाजाराला सामान घेऊन बसतात, त्यांना हातभार लावावा. प्रास्ताविकात शिक्षिका अग्नीरा गाड यांनी कार्यक्रमाचे आयोजन का करण्यात आले? व्यावहारिक ज्ञानाची भर कशी विद्यार्थ्यांना मिळेल? याविषयी आढावा घेतला. शिक्षिका रचना पुनाजी, शिक्षिका तेजस्वी पटेकर, शिक्षिका सायनुरी नाईक यांनी पाहुण्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. सूत्रसंचालन शिक्षिका शुभांगी ठाकूर यांनी केले. यावेळी पाहुण्यांनी आणि उपस्थित शिक्षक पालकांनी विद्यार्थी बाजारात वेगवेगळे साहित्य समान, भाजीपाला, खाद्यपदार्थ विक्रीला बसले होते, त्याची खरेदी केली.

साखळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची 'बिट्स पिलानी' येथे शैक्षणिक सहल

प्रगत संशोधन सुविधा आणि प्रायोगिक तंत्रांची घेतली माहिती

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २१ : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी डीबीटी स्टार कॉलेज योजनेंतर्गत बिट्स पिलानी गोवा कॅम्पस येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले होते. या शैक्षणिक सहलीत २३ विद्यार्थी सहभागी झालेले होते. या विद्यार्थ्यांना प्रा. महेंद्र पेडणेकर, प्रा. आगा, प्रा. सुवर्णा पाटील, प्रा. अनुष्का पणजीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांना बिट्स पिलानी येथील प्रगत संशोधन सुविधा आणि प्रायोगिक तंत्राची माहिती करून देणे हा या शैक्षणिक सहलीचा उद्देश होता. या शैक्षणिक सहलीत सुरुवातीला विद्यार्थ्यांना सोफोस्टिकेटेड इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी (सीएसआयएफ) येथील वैज्ञानिक तपासासाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक संशोधन तंत्रांची ओळख तज्ज्ञांकडून करून देण्यात आली. प्रगत उपकरणांच्या कार्य तत्त्वांचे आणि प्रयोगांचे स्पष्टीकरण देणारी प्रात्यक्षिके तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी संस्थेच्या भौतिक प्रयोगशाळांना भेट दिली. या प्रयोगशाळांमधील अत्याधुनिक प्रायोगिक व्यवस्था आणि चालू संशोधन उपक्रमांचे निरीक्षण केले.

साखळी : बिट्स पिलानी कॅम्पस येथे आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीत सहभागी झालेले कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग.

बिट्स पिलानीमधील प्राध्यापक-संशोधकांशी संवाद

यावेळी साखळी सरकारी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी बिट्स पिलानी मधील प्राध्यापक, संशोधक यांच्याशी भौतिकशास्त्र, प्रकाशशास्त्र आणि नॅनो तंत्रज्ञान या विषयांवर चर्चा केली.

CHANGE IN NAME

I **ROSY D'COSTA,** r/o H.NO.5/214 UMTA VADDO CALANGUTE BARDEZ GOA.403516 like to change my name from **ROSY DA COSTA** to **ROSY D'COSTA** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **ROSY D'COSTA.**

PUBLIC NOTICE

Notice is given to the general public that my client *TERRAVESTA BUILDWELL LLP* is desirous of purchasing, free from encumbrances and subject to marketability of title from **M/S KANUGA REALTORS AND CONSTRTUCTION CO. PVT. LTD.**, a registered company incorporated under the Indian Companies Act, 1956, having its office at Reg. Office at K22 8, A Lane, W-12, Sainik Farm, New Delhi, 110062; ALL THAT immovable property known as Prabhu Vaddo", admeasuring an area of 529 Sq. mts., surveyed under Survey No. 370/2-B of Village Calangute, along with all that building project known as Flamingo, constructed therein, situated at Calangute, within the limits of Village Panchayat of Calangute, Taluka and Sub District of Bardez, of the North District of the State of Goa, bearing House No. E-4/205C and described in the Land Registration Office under No. 1744 at folio 175 of Book B New and enrolled in the Taluka Revenue Office at Mapusa under Matriz No. 77, described in detail in Schedule hereunder written.

Any persons/entity (corporate or otherwise), having any right, title, interest, benefit, claim or demand in or to the said property or any part thereof by way of sale, exchange, gift, lease, tenancy, license, assignment, mortgage, charge, lien, trust, family arrangement / settlement, encumbrance, inheritance, bequest, easement, possession, maintenance, development, rights, order / decree / judgement of any court, or any other agreement, understanding or otherwise howsoever to the said property may lodge their claims and objections if any to the said proposed sale, are given notice to make the same known in writing with supporting documents to the undersigned at the address given below ***within 14 (Fourteen) days*** from the date of publication of this notice failing which it shall be deemed that there are no claims or objections from any one to the said proposed sale in favour of my client and that my client shall thereafter be free to complete the sale on the expiry of this notice period without any reference to such claim and objections from any person whatsoever and the same, if any, shall be considered as waived and/or abandoned.

SCHEDULE

(DESCRIPTION OF THE SAID PROPERTY)

ALL THAT immovable property known as **"Prabhu Vaddo"**, admeasuring an area of **529** sq. mts., surveyed under **Survey No. 370/2-B** of Village **Calangute**, along with all that building project known as **Flamingo**, constructed therein, situated at Calangute, within the limits of Village Panchayat of Calangute, Taluka and Sub District of Bardez, of the North District of the State of Goa, Bearing House No. E-4/205C and described in the Land Registration Office under No. 1744 at folio 175 of Book B New and enrolled in the Taluka Revenue Office at Mapusa under Matriz No. 77 and which is bounded as under:

ON THE NORTH: By an Access; ON THE SOUTH: By property bearing Survey No. 370/5; ON THE EAST: By property bearing Survey No. 370/2; ON THE WEST: By an Access

Panaji, Dated 21.02.2025

Sd/- **Adv. Sairaj Ulhas Bhaje**
507, Citi Centre, Patto, Panaji,
Goa 403001 Ph: **7972286100**

CHANGE IN NAME

I **JUSTINA AVELINA CRASTO E DSILVA.** R/o. Hno-218, Soco Vaddo Assolna Ambelim Salcete Goa. Would like to change my name from **JUSTINA AVELINA CRASTO E SILVA** TO **JUSTINA AVELINA CRASTO E DSILVA** hereafter in all documents and dealing will be known by the name **JUSTINA AVELINA CRASTO E DSILVA.**

SHREE GOPAL KRISHNA DEVALAYA TRUST
Mathwada Okamb, Dharbandora Goa
LOTTERY DRAW
Draw of Donation coupons held on 18/02/2025 at 12.30 a.m. at Shree Gopal Krishna Devalaya hall Mathwada Okamb, Dharbandora Goa
CONSOLATION PRIZES
1) **1960** (One Nine Six Zero)
2) **1390** (One Three Nine Zero)
3) **5189** (Five One Eight Nine)
4) **4055** (Four Zero Five Five)
3rd Prize - 5275
(Five two seven five)
2nd Prize - 4154
(Four one five four)
1st prize - 1622
(One six two two)

VILLAGE PANCHAYAT AMONA, BICHOLIM
Ref. No. VP/AMN- BICH / F-30 / 2024-25 / 1106
Date: 20.02.2025
PUBLIC NOTICE
Notice is hereby given to the General Public that, Village Panchayat Amona, Bicholim, Goa in its Ordinary Gramsabha dated 16/02/2025, vide resolution No. 2, has resolved unanimously to Revised Procedure for levying of taxes under Sub Section 1 & 3 of section 153 and fees as per section 243 of the Goa Panchayat Raj Act 1994 (Power of V. P. to make Own By-Laws). That the said Revised Taxation structure/rates/details are published on Notice Board of Village Panchayat Amona and same will take effect starting in the upcoming financial year, which is 2025 - 2026.
Members of General Public / any Person, Company / Industries / Factories / Hotels or any Commercial Unit of V. P. Jurisdiction of Amona, having any Suggestion/Objection of whatsoever nature in respect of said Revised Taxation system of V. P. Amona, should submit in writing, his/her/its suggestion/objection at V. P. Office within period of 30 days from the date of publication hereof, failing which Panchayat shall proceed with the said Revised Taxation System from 01.04.2025 and any suggestion/Objection made thereafter shall not be entertained.
Sd/- **Sagar K. Fadte (Sarpanch)**
Seal **Village Panchayat Amona**